| Published Date: | 28 Aug 2018 | Publication: | Dainik Sahasik (Marathi) |
|---|---|---|---|
| Edition: | Nagpur | Page No: | 6 |
| MAV/CCM: | 3808.8/10.58 | Circulation: | 7000 |

# टीसीएस आयटी विझ तर्फे शालेय मुलां-साठी नागपूरात तंत्रज्ञान प्रश्नमंजुशा

**शहर प्रतिनिधी/ २७ ऑगस्ट, नागपूर :** टाटा कन्सल्टन्सी सव्हिसेस (टीसीएस) या अग्रगण्य आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय सोल्यूशन्स फर्मने टीसीएस आयटी विझ २०१८ या भारतातील शालेय मुलांसाठीच्या सर्वात मोठ्या तंत्रज्ञान प्रश्नमंजूषेच्या नागपूर आवृत्तीची आज घोषणा केली. ही स्पर्धा मंगळवार, सप्टेंबर चार रोजी, नागपूरमधील सिव्हिल लाइन्स भागात एमएलए होस्टेलच्या समोर डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात घेतली जाणार आहे. आठवी ते बारावी इयत्तेत शिकणारे शालेय विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र आहेत. प्रत्येक शिक्षणसंस्था यामध्ये एक किंवा एकाहून अधिक संघ पाठवू शकते. प्रत्येक संघात दोन स्पर्धक असतील. यासाठी कोणतेही प्रवेशशुल्क नाही. टीसीएस आयटी विझ २०१८ ही प्रश्नमंजूषा देशातील १२ ठिकाणी घेतली जाणार आहे अहमदाबाद, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदोर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे यासाठी संबंधित शिक्षणसंस्थेमार्फत प्रवेशिका मंगळवार, २८ ऑगस्ट रोजी किंवा त्यापूर्वी, पुढील पत्त्यावर पोहोचणे आवश्यक आहे. क्विझ को-ऑर्डिनेटर, टीसीएस आयटी विझ, टाटा कन्सल्टन्सी सव्हिसेस, अग्रवाल हाउस, बुराडे गल्ली, तेलीपुरा, सिताबर्डी, नागपूर. प्रादेशिक विजेत्याला ६०,००० रुपये मूल्याचे गिफ्ट व्हाउचर देण्यात येईल, उपविजेत्यांना ४०,००० रुपये किमतीचे गिफ्ट व्हाउचर दिले जाईल. याशिवाय विजेत्या तसेच उपविजेत्या संघाला विशेष तयार केलेली ट्रॉफी आणि पदके दिली जातील. अंतिम फेरीत प्रवेश केलेल्या सहा संघांनाही टीसीएसकडून अनेक बक्षिसे दिली जातील. यात जीम बॅग, ब्लूटूथ स्पीकर्ससह मल्टिफंक्शनल म्युझिक टॉर्च, वायरलेस आउटडोअर स्पीकर्स आणि टीसीएस५० पेन ड्राइव्ह समावेश असेल.